Pariwar

An Open Education System

# MPSC

# प्रचलित घडामोडी

## स्पेशल कोर्स (मराठी)




Headlines: ४ ते ९ मार्च २०२०

१० मार्च २०२०

# हेडलाईन्स

## सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांमध्ये विलिनीकरणाला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी

- 1 एप्रिल 2020 पासून सार्वजनिक क्षेत्रातील 10 बँकांचे चार बँकांमध्ये विलिनीकरण होणार आहे.
- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्रिमंडळाने सार्वजनिक क्षेत्रातील 10 बँकांचे 4 बँकांमध्ये विलिनीकरण करायला मंजुरी दिली.
- यामध्ये :

1. ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्स आणि युनायटेड बँक ऑफ इंडियाचे पंजाब नॅशनल बँकेत विलिनीकरण
2. सिंडिकेट बँकेचे कॅनरा बँकेत विलिनीकरण
3. आंध्र बँक आणि कॉर्पोरेशन बँकेचे युनियन बँक ऑफ इंडियामध्ये विलिनीकरण
4. अलाहाबाद बँकेचे इंडियन बँकेत विलिनीकरण

- 1 एप्रिल 2020 पासून हे विलिनीकरण केले जाईल. यातून सार्वजनिक क्षेत्रातील सात मोठ्या बँकांची निर्मिती होईल ज्यांची राष्ट्रीय व्याप्ती मोठी असेल आणि एकत्रित व्यवसाय आठ लाख कोटी रुपये इतका असेल.
- या व्यापक विलिनीकरणामुळे जागतिक बँकांशी तुलना करता येईल आणि देशात तसेच परदेशात स्पर्धा करायची प्रभावी क्षमता असलेल्या बँकांची निर्मिती करता येईल.
- या विलिनीकरणामुळे खर्चात बचत होईल आणि सार्वजनिक क्षेत्रातील बँका भारतीय बँकिंग व्यवस्थापनात स्पर्धात्मकता आणि सकारात्मकतेचा प्रभाव पाडू शकतील.
- या विलिनीकरणामुळे बँकांना मोठ्या प्रमाणावर कर्जे देता येऊ शकतील. विलिनीकरण केलेल्या सर्व बँकांमध्ये सर्वोत्तम पद्धतीचा अवलंब केल्यास बचत होईल तसेच जोखीम व्यवस्थापनात सुधारणा होईल. व्याप्ती वाढल्यामुळे वित्तीय समावेशकतेच्या उद्दिष्टाला चालना मिळेल.
- सर्व बँकांनी तंत्रज्ञानाचा स्वीकार केल्यास मोठा डेटाबेस मिळेल आणि बँका वेगाने डिजिटल होतील आणि स्पर्धेचा लाभ उठवू शकतील.

## येस बँकेवर (YES Bank) रिझर्व्ह बँकेचे आर्थिक निर्बंध

- आरबीआयने बँकिंग नियमन कायदा कलम 45 अंतर्गत खासगी क्षेत्रातील येस बँकेवर खालील आर्थिक निर्बंध लागू केले.
- बँकेचे संचालक मंडळ 30 दिवसांसाठी बरखास्त केले गेले व बँकेचे प्रशासक म्हणून स्टेट बँकेचे माजी अधिकारी प्रशांत कुमार यांची निवड केली.
- या निर्बंधांमुळे येस बँकेला कोणतीही गुंतवणूक करता येणार नाही तसेच कोणतेही कर्ज देता येणार नाही किंवा कोणत्याही कर्जाचे पुनर्नवीकरण करता येणार नाही.
- खातेदारांना महिनाभरात 50 हजार रुपये एवढीच रक्कम काढता येणार.

**आर्थिक निर्बंध लादण्याची कारणे :**

- बँकेची आर्थिक स्थिती खालावली.
- बँकेला भांडवल उभे करण्यात अपयश आले.
- व्यवसायाची गुणवत्ता घसरून प्रशासनाबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाला.

**येस बँकेची पूर्ण उभारणी करण्यासाठी :**

- आरबीआयने 'येस बँक लिमिटेड पुनर्रचना योजना 2020' चा मसुदा तयार केला आहे.
- तसेच आर्थिक स्थिती चांगली असणाऱ्या इतर बँकांना येस बँकेतील काही हिस्सा खरेदी करावा लागेल.

**येस बँक (YES bank) विषयी :**

- ही एक खासगी क्षेत्रातील चौथ्या क्रमांकाची बँक आहे.
- स्थापना : 2004
- संस्थापक : राणा कपूर, अशोक कपूर
- मुख्यालय : मुंबई
- एकूण मालमत्ता : जवळपास 3 लाख कोटी रु.
- एकूण शाखा : 1122
- फोन पे ही स्मॉल पेमेंट बँक पूर्णपणे येस बँकेवर अवलंबून आहे.

## सर्वोच्च न्यायालयाने उठवली क्रिप्टोकरन्सीच्या ट्रेडिंगवरील बंदी

- सर्वोच्च न्यायालयाने आभासी चलनाच्या (क्रिप्टोकरन्सी) वापरावर लावण्यात आलेली बंदी उठवली असून व्यवहारात वापर करण्यासाठी परवानगी दिली आहे.
- रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने एप्रिल 2018 मध्ये

बिटकॉइनसारख्या आभासी चलनाच्या ट्रेडिंगवर बंदी आणली होती. आरबीआयने बिटकॉइन तसंच इतर आभासी चलनांसंबधी नियम अत्यंत कठीण केले होते. यावेळी त्यांनी बँक आणि इतर आर्थिक संस्थांना कोणत्याही सेवा देण्यापासून बंदी घातली होती.

- सर्वोच्च न्यायालयाच्या तीन न्यायाधीशांच्या खंडपीठासमोर मोबाइल असोसिएशन ऑफ इंडियाच्या याचिकेवर बुधवारी सुनावणी पार पडली. यावेळी सर्वोच्च न्यायालयाने बंदी उठवण्याचा निर्णय दिला. न्यायालयाने आरबीआय अशा प्रकारची बंदी आणू शकत नाही असं सांगितलं. आरबीआयने आपल्या आदेशात सांगितलं होतं की, कोणत्याही आर्थिक संस्थेने क्रिप्टोकरन्सीमध्ये गुंतवणूक करु नये. यासोबतच आरबीआयने सामान्य नागरिकांना क्रिप्टोकरन्सीवर ट्रेडिंग केल्यानंतर होणाऱ्या नुकसानासाठी स्वत: जबाबदार असतील असा इशारा दिला होता.
- 2018 मध्ये आभासी चलन बिटकॉइनचं महत्त्व आणि किंमत वाढत होती. अनेकांनी बिटकॉइनच्या सहाय्याने मोठी कमाई करत नफा मिळवला होता. बिटकॉइनचा वाढता वापर लक्षात घेता आरबीआयने त्याला चलन म्हणून मान्यता देण्यास नकार दिला होता. सोबतच बिटकॉइनमध्ये ट्रेडिंगमुळे होणाऱ्या नुकसानासाठी आरबीआय जबाबदार राहणार नाही असंही स्पष्ट केलं होतं.

## केंद्रीय अर्थसचिवपदी अजय भूषण पांडे

- केंद्रीय अर्थसचिवपदी अजय भूषण पांडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ते सध्या महसूल सचिव म्हणून कार्यरत आहेत.
- सध्याचे अर्थ सचिव राजीव कुमार यांची ते जागा घेतील.
- अजय भूषण पांडे हे 1984 च्या बॅचचे महाराष्ट्र केडरचे अधिकारी आहेत.
- ते 'युनिक आयडेंटिफिकेशन ऑथॉरिटी ऑफ इंडिया'च्या म्हणजेच आधारच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी ओळखले जातात.
- पांडे आयआयटी कानपूरचे पदवीधर आहेत. तसेच, त्यांनी मिनिसोटा युनिव्हर्सिटीमधून पदव्युत्तर शिक्षण घेतले असून, 'पीएचडी'ही केली आहे.

## बेंगळुरूमध्ये 19 वी 'जागतिक उत्पादकता परिषद' भरणार

- 6 मे ते 8 मे 2020 या कालावधीत बेंगळूरू (कर्नाटक) या शहरात 19 वी 'जागतिक उत्पादकता परिषद' आयोजित केली जाणार आहे. हा कार्यक्रम जागतिक उत्पादकता विज्ञान महासंघ (WCPS) यांच्या नेतृत्वाखाली 'इंडस्ट्री 4.0 – इनोव्हेशन अँड प्रॉडक्टिव्हिटी' या विषयाखाली आयोजित केला जाणार आहे.
- उत्पादन क्षमतेच्या विकासासंदर्भात चर्चा करण्यासाठी हे जगातले सर्वात मोठे मंच आहे. तब्बल 45 वर्षांनंतर पुन्हा एकदा ही परिषद भारतात होणार आहे. या वर्षी चर्चेत चौथ्या औद्योगिक क्रांतीवर भर दिला जाणार आहे.
- जागतिक उत्पादकता विज्ञान महासंघ (WCPS) 1969 सालापासून हा कार्यक्रम आयोजित करीत आहे. त्याचे मुख्यालय मॉन्ट्रियल (कॅनडा) येथे आहे. नावीन्यपूर्ण आणि जागतिक पातळीवरील पद्धतींवर विचारपूर्वक चर्चा करण्यासाठी हा कार्यक्रम एक महत्त्वाचे व्यासपीठ आहे. या कार्यक्रमात उद्योगपती, विद्वान, प्रशासक तसेच उद्योग, वाणिज्य आणि सार्वजनिक सेवा क्षेत्रातले कार्यकर्ते एकत्र येतात.

**'इंडस्ट्री 4.0' म्हणजे काय?**

- 'इंडस्ट्री 4.0' हा चौथ्या औद्योगिक क्रांतीचा उपसंच आहे जो उद्योगाशी निगडित आहे. चौथ्या औद्योगिक क्रांतीमध्ये मानवाने तयार केलेल्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर निर्मिती, सेवा, कृषी अशा प्रमुख क्षेत्रांमध्ये दैनंदिन वापरासाठी केला जाणार आहे. 'स्मार्ट शहर' उपक्रम हा याच संकल्पनेचा एक भाग आहे.
- अत्याधुनिक तंत्रज्ञानामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर केला जाणार आहे, ज्यामार्फत मानवाच्या जागी यंत्रांची व्यवस्था केली जाणार. सगळ्या प्रक्रिया या संगणकाच्या माध्यमातून नियंत्रित होणार.
- यासंबंधीची संकल्पना 2011 साली जर्मनीने एका प्रकल्पाच्या माध्यमातून जगापुढे मांडली. पुढे 2012 साली त्याच्या अंमलबजावणीबाबत काही शिफारसी देण्यात आल्या.

## दिल्लीत 11 वी 'राष्ट्रीय कृषी विज्ञान केंद्र (KVK) परिषद' संपन्न झाली.

- केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण आणि ग्रामविकास व पंचायती राज मंत्री नरेंद्र सिंग तोमर ह्यांच्या हस्ते 28 फेब्रुवारी 2020 रोजी 11 व्या 'राष्ट्रीय कृषी विज्ञान केंद्र परिषद' या कार्यक्रमाचे उद्‌घाटन दिल्लीत झाले.

**कृषी क्षेत्रातले राष्ट्रीय कृषी विज्ञान केंद्राचे योगदान**

- कृषी क्षेत्रात संशोधन व विकास करण्यात कृषी विज्ञान केंद्राचा मोठा हातखंडा आहे. आतापर्यंत पिकांचे अनेक उत्तम वाण विकसित करण्यात आले आहेत.
- शिवाय मार्गदर्शनासाठी 171 मोबाइल ॲप्स तयार करण्यात आले आणि 3 लक्षांहून अधिक कॉमन सर्व्हिस सेंटर उघडण्यात आले आहेत.
- शेतकऱ्यांना चांगला भाव मिळावा यासाठी 'eNAM' ही डिजिटल व्यासपीठ तयार करण्यात आले. आज यावर 585 मंडया उपलब्ध आहेत आणि आणखी 415 मंडया उपलब्ध होण्याच्या मार्गावर आहेत.
- प्रत्येक विभागामध्ये किमान दोन फॉर्मर्स प्रोड्यूसर ऑर्गनायझेशन (FPO) स्थापन करण्याचे केंद्र सरकारचे उद्दिष्ट आहे.
- 1974 साली पुद्दुचेरी येथे प्रथम कृषी विज्ञान केंद्र उघडण्यात आले. आज देशभरात 717 कृषी विज्ञान केंद्र कार्यरत आहेत.

## सुपोषित माँ अभियान

- उद्दिष्ट : कुपोषण निर्मूलन, किशोरवयीन मुली आणि देशातल्या गर्भवती महिलांना पोषक आहार प्राप्त व्हावा, भावी पिढ्यांना शारीरिक व मानसिकदृष्ट्या बळकट करणे.
- मंत्रालय : केंद्र सरकारचे महिला व कुटुंब कल्याण मंत्रालय
- उद्‌घाटन : लोकसभा सभापती ओम बिर्ला ह्यांच्या हस्ते राजस्थानच्या कोटा या शहरात.

**योजनेचे स्वरूप**

- कार्यक्रमाच्या प्रारंभिक टप्प्यात 1 महिना आणि 12 दिवस या कालावधीत 1000 गर्भवती महिलांना संतुलित आहार दिला जाणार आणि आवश्यक चाचण्या, अल्ट्रासाऊंड, रक्त तपासणी यासारख्या सर्व वैद्यकीय खर्चाचा भार सरकार उचलणार आहे.
- गहू, हरभरा, मका, बाजरीचे पीठ, गूळ, डाळी, मसूर, तूप, शेंगदाणे, तांदूळ आणि खजूर इ. पौष्टिक वस्तू प्रत्येक कुटुंबातल्या एका गर्भवती महिलेस देण्यात येणार.
- उद्‌घाटनाला 1000 गर्भवती महिलांना संतुलित आहार असलेल्या 17 किलोग्राम इतक्या वजनाच्या अन्न पदार्थांचे 1000 संच वितरित करण्यात आले.

## ARCI संस्थेचे आपत्कालीन परिस्थितीत वीज उपलब्धतेसाठी 'फ्युअल सेल' तंत्रज्ञान

- हैदराबादच्या इंटरनॅशनल ॲडव्हान्स्ड रिसर्च फॉर पावडर मेटॅलर्जी ॲंड न्यू मटेरियल्स (ARCI) या संस्थेतल्या संशोधकांनी पॉलिमर इलेक्ट्रोलाइट मेम्ब्रेन फ्युअल सेल्स (PEMFC) नावाचे 'फ्युअल सेल' तंत्रज्ञान विकसित केले.

**ठळक बाबी:**

- हे तंत्रज्ञान 1 ते 20 किलोवॅट (kW) या दरम्यान ऊर्जा निर्माण करण्यास सक्षम आहे.
- विकेंद्रित ऊर्जा निर्मिती प्रणालीतल्या अनुप्रयोगांसह हे तंत्रज्ञान कमी तापमानात सुद्धा कार्य करण्यास सक्षम आहे.
- आपत्कालीन परिस्थितीत ऊर्जेचा एक पर्याय म्हणून हे तंत्रज्ञान वापरले जाऊ शकते.
- फ्युअल सेल प्रणाली पारंपरिक बॅटरी बॅकअप प्रणालीद्वारे आवश्यकतेनुसार ग्रीड पॉवरची आवश्यकता न बाळगता हायड्रोजन गॅस वापरून शाश्वत स्वच्छ वीज प्रदान करते.

### CRISPR (CaS9)

- अंधत्वाचा उपचार करण्यासाठी पहिल्यांदाच CRISPR (Clustered Regularly Interspaced Short Palindromic Repeats) नावाचा जीन एडिटिंग टूल वापरला गेला.
- अमेरिकेच्या पोर्टलॅंडच्या ओरेगॉन विद्यापीठात हे साध्य झालं आहे.

### CRISPR म्हणजे काय?

- हे डीएनए सिक्वेन्सचा एक प्रकार आहे जे बॅक्टेरियासारख्या आदीकेंद्रकी जीवांमध्ये आढळते. ते बॅक्टेरियोफेजच्या डीएनएमधून घेतले आहेत. बॅक्टेरियोफेज हा एक विषाणू

आहे जो बॅक्टेरिया संक्रमित करतो.

- या तंत्रज्ञानाचा वापर सजीवांतील जनुक संपादित करण्यासाठी केला जातो. हे एक सजीवांच्या शरीरात निर्माण होणारे विकर आहे.
- CRISPR संबंधित जनुकीय स्थान लक्षीत करण्यास अनुमती देते. लक्ष्य ओळखल्यानंतर ते त्या विशिष्ट डीएनए अनुक्रमात जोडते, काढून टाकते किंवा बदलते.
- यांनाच आण्विक किंवा जनुकीय कैची म्हणतात.
- Restriction Endonuclease याचे आणखी एक उदाहरण आहे.

## भारत सरकारने 'जीनोम इंडिया' प्रकल्पाला मंजुरी दिली.

- विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाच्या अंतर्गत कार्य करणाऱ्या जैवतंत्रज्ञान विभागाने 'जीनोम इंडिया प्रकल्प' भारतात राबविण्यास त्यांची परवानगी दिली.

**ठळक बाबी :**

- भारतीय विज्ञान संस्था (IISc) बेंगळूरू आणि इतर 20 आघाडीच्या संस्था या प्रकल्पाचा भाग असणार आहेत.
- प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात संदर्भ जीनोम (जनुकीय संरचना) माहिती तयार करण्यासाठी 10,000 व्यक्तींचे नमुने गोळा केले जाणार.
- IISc बेंगळूरू अंतर्गत कार्यरत असलेले मेंदू संशोधन केंद्र (CBR) या प्रकल्पाची केंद्रीय समिती म्हणून काम करणार.

**जीनोम विषयी :**

- पेशीमध्ये असणारा डीऑक्सिबोन्यूक्लिक ॲसिड (DNA) यांचा क्रम हा जीनोम (जनुकीय संरचना) म्हणून ओळखला जातो. त्यात एखाद्या व्यक्तीची संपूर्ण अनुवंशिक (वंशानुगत) माहिती असते.
- 'ह्यूमन जीनोम प्रोजेक्ट' प्रकल्पाद्वारे प्रेरणा घेत हा प्रकल्प भारतात चालवला जाणार आहे. 'ह्यूमन जीनोम प्रोजेक्ट' अमेरिकेच्या सरकारकडून अर्थसहाय्यित असलेला एक आंतरराष्ट्रीय प्रकल्प होता.
- 1990 साली या प्रकल्पाला सुरुवात करण्यात आली, जो 2003 सालापर्यंत चालला. मानवी जनुकीय रचनेचा नकाशा बनविणे आणि गुणसूत्रांचा संपूर्ण क्रम मिळविण्यासाठी त्यांना एकत्रित करणे हा त्या प्रकल्पाचा उद्देश होता.

## चंबळ अभयारण्य इको-सेन्सिटिव्ह झोन म्हणून घोषित

- मध्य प्रदेशातील राष्ट्रीय चंबळ अभयारण्याला भारत सरकारच्या पर्यावरण मंत्रालयाने इकोसेन्सिटिव्ह झोन म्हणून जाहीर केले आहे.
- याअंतर्गत अभयारण्याच्या सभोवतालचे 0 ते 2 किलोमीटर्सपर्यंतचे क्षेत्र हे इको सेन्सिटिव्ह झोन असणार आहे.

**चंबळ अभयारण्याविषयी :**

- हे अभयारण्य मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश आणि राजस्थान या राज्यांच्या सीमेवर आहे.
- राष्ट्रीय चंबळ अभयारण्यांतर्गत एकूण संरक्षित क्षेत्र हे 5400 चौ. किलोमीटर्स आहे.
- याचे स्थान मध्य प्रदेशातील भिंड ,मोरोना व शेओपुर या जिल्ह्यामध्ये आहे.
- विस्तार : चंबळ नदी लगत विंध्यपर्वतापासून यमुना नदी पर्यन्त
- या अभयारण्यात स्थलांतरित पक्ष्यांच्या व गोड्या पाण्यातील कासवांच्या प्रजाती आढळतात. या अभयारण्यात गंगोटिक डॉल्फिन व घरियाल जातीची मगर आढळते.

**भारतातील प्रमुख अभयारण्ये :**

| | |
|---|---|
| इंद्रावती (वाघ) | छत्तीसगड |
| सिमलीपाल (वाघ) | मयुरभंज, ओडिशा |
| रणथंबोर (वाघ) | सवाईमाधवपूर, राजस्थान |
| मानस (वाघ) | बारपेटा, आसाम |
| सुंदरबन (वाघ) 24 | परगणा, पश्चिम बंगाल |
| दालमा (वाघ) | सिंघभुम, झारखंड |
| दांडेली (वाघ) | कर्नाटक |
| परंबीकुलम (वाघ) | पालघाट, केरळ |
| कावल (वाघ) | आदिलाबाद, तेलंगणा. |
| इटांगकी (हत्ती) | कोहिमा, नागालँड |
| दाचीगम (हंगूल हरीण) | श्रीनगर |
| सुलतानपूर लेक (पक्षी) | गुरगाव, हरियाणा |
| घटप्रभा (पक्षी) | कर्नाटक |

रंगनथट्टू (पक्षी) म्हैसुर, कर्नाटक

## वर्ल्ड मायग्रेशन रिपोर्ट 2020

- हा अहवाल संयुक्त राष्ट्रसंघाच्या 'इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन ऑन मायग्रेशन' या संस्थेतर्फे तयार केला जातो.

**या अहवालातील ठळक बाबी :**

- देशविरहित लोक : या लोकांना कुठल्याच देशाचे नागरिकत्व नसते व असे लोक प्रामुख्याने सीमावर्ती भागात राहतात.
- वर्ल्ड मायग्रेशन रिपोर्ट 2020 (जागतिक स्थलांतर अहवाल) नुसार जगात सर्वाधिक देशविरहीत (स्टेटलेस पीपल्स) लोकांमध्ये बांगलादेशचा प्रथम क्रमांक लागतो.
- 2018 मध्ये देशविरहित लोकांची संख्या 39 लाख एवढी होती.

**सर्वाधिक देशविरहित लोकसंख्या असणारे देश :**

1) बांगलादेश - 9 लाख
2) कोट द ओयवोरे - 7 लाख
3) म्यानमार - 6 लाख

- स्थलांतरित लोक : जगभरात सुमारे 27 कोटी लोक स्थलांतरित असून यात सर्वाधिक संख्या ही भारतीयांची आहे.
- सर्वाधिक स्थलांतरित लोकसंख्या असणारे देश (त्या विशिष्ट देशाचे इतर देशांमध्ये राहत असलेले लोक) :

1) भारत 1.75 कोटी
2) मेक्सिको 1.2 कोटी
3) चीन 1.1 कोटी

**स्थलांतराची कारणे :**

- हल्ले, गृहयुद्ध, रोजगार इ. कारणांमुळे या लोकांनी अन्य देशांमध्ये स्थायिक होण्याचा प्रयत्न केला आहे.
- शरणार्थी लोक : 2018 मध्ये जगभरात सुमारे अडीच कोटी शरणार्थी होते.
- शरणार्थींमध्ये सर्वाधिक सुमारे 52 टक्के लोक हे 18 वर्षांपेक्षा कमी वयाचे आहेत.

## हिंद महासागर आयोगाचा पाचवा निरीक्षक भारत

- 6 मार्च 2020 रोजी भारत हिंद महासागर आयोगाचा पाचवा निरीक्षक झाला. माल्टा, चीन, युरोपीय संघ आणि इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन ऑफ ला फ्रान्कोफोनी (OIF) हे आयोगाचे इतर चार निरीक्षक आहेत.

**मुख्य बाबी**

- या आयोगाचा निरीक्षक बनल्यामुळे भारताला पश्चिम हिंद महासागरातल्या आफ्रिका खंडाच्या आग्नेय किनाऱ्यास जोडणाऱ्या आपल्या योजनांचा विस्तार करण्यात मदत होणार.
- हिंद-प्रशांत क्षेत्रातल्या पश्चिम भागासोबत भारताच्या हितसंबंधांचे समर्थन करणे हा या निवडीमागचा हेतू आहे. तसेच हिंद क्षेत्रातल्या प्रत्येकासाठी सुरक्षा आणि वृद्धी धोरणाचा देखील भारताला फायदा होणार आहे.

**हिंद महासागर आयोग**

- 1982 साली मॉरिशस देशाच्या पोर्ट लुईस या शहरात हिंद महासागर आयोग (Indian Ocean Commission -IOC) याची स्थापना झाली.
- 1984 मध्ये व्हिक्टोरिया कराराद्वारे सेशल्स या शहरात संस्थागत केली गेली.
- या समूहात मॉरिशस, मादागास्कर, कोमोरोस, फ्रान्स आणि सेशल्स अशा पाच आफ्रिकी हिंद महासागर राष्ट्रांचा समावेश आहे.

## ठळक घडामोडी

1) औरंगाबाद विमानतळाचे ‘छत्रपती संभाजी महाराज विमानतळ, औरंगाबाद‘ असे नामकरण - राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी.

2) पॉक्सो कायद्याअंतर्गत दाखल झालेल्या प्रकरणांचा तसेच महिलांवरील बलात्काराच्या प्रलंबित खटल्यांचा तातडीने निकाल लावण्यासाठी राज्यात 138 विशेष जलदगती न्यायालये स्थापन करण्यास राज्य सरकारची मंजुरी.

3) राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते महाराष्ट्रातील चार कलाकारांना राष्ट्रीय ललित कला अकादमी पुरस्कार.

4) ‘यु पास’ या शस्त्रक्रियेचे डॉक्टर आशिष पाटील यांच्याकडून संशोधन. या संशोधनास पेटंट प्राप्त.

5) कोरोनामुळे भारताकडून चीन सोबतच इटली, इराण, दक्षिण कोरिया व जपानच्या नागरिकांचे व्हिसा रद्द. प्रवासावर निर्बंध.

6) 2021 ची 108 वी इंडियन सायन्स काँग्रेस परिषद पुण्यात होणार. 105 वी - इम्फाळ (मणिपुर),106 वी - जालंधर, 107 वी - बेंगळूरू.

7) डॉक्टर माधुरी कानिटकर यांची लेफ्टनंट जनरल पदावर पदोन्नती. लष्करातील या उच्च पदावर पोहोचलेल्या त्या पहिल्या महिला मराठी अधिकारी ठरल्या आहेत.

8) मोहिउद्दिन यासीन - मलेशियाचे नवे पंतप्रधान.

9) 1 ते 7 मार्च या कालावधीत देशभरात जन औषधी सप्ताहाचे आयोजन.

10) भारताचा आर्मेनियासोबत 40 दशलक्ष डॉलर्सचा संरक्षण करार - करारांतर्गत DRDO ने विकसित केलेले ‘SWATHI’ रडार भारत अर्मेनियास पुरवेल.

11) महाराष्ट्रावरील कर्जाचा बोजा वाढला - जवळपास 4 लाख 71 हजार कोटींचे राज्यावर कर्ज.

12) नागरी उड्डाण क्षेत्रातल्या 100 टक्के थेट परकीय गुंतवणुकीस केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी.

13) DRDO ची स्फोटके शोधणारी नवीन प्रणाली - ‘RalDerX’

14) सार्वजनिक परिवहन व्यवस्था नि:शुल्क देणारा पहिला देश - लक्झेमबर्ग.

15) 500 टी-ट्वेंटी मॅचेस खेळणारा जगातील पहिला क्रिकेटपटू- किरॉन पोलार्ड. (वेस्ट इंडीज)

16) आंतरराष्ट्रीय T-20 वर्ल्ड कपचा अंतिम सामना ऑस्ट्रेलिया व भारत यांच्यामध्ये रंगला. भारत 85 धावांनी पराभूत. ऑस्ट्रेलियाला पाचव्यांदा जेतेपद.

17) बिहार राज्य सरकार तेरा जिल्ह्यांमध्ये ऑरगॅनिक कॉरिडॉर उभारणार.

18) 2021 च्या सुरुवातीला ‘चांद्रयान 3’ मिशन इस्रोकडून राबवले जाणार.

19) शून्य भेदभाव दिवस- 1 मार्च.

20) जागतिक वन्यजीव दिवस - 3 मार्च.

21) राष्ट्रीय सुरक्षा दिवस - 4 मार्च.

22) टोकियो ऑलिंपिक 2020 चे आदर्श वाक्य - ‘युनायटेड बाय इमोशन’

23) 5 मार्च - महाराष्ट्र राज्य आर्थिक पाहणी अहवाल जाहीर.

24) 6 मार्च - महाराष्ट्र राज्याचा वार्षिक अर्थसंकल्प जाहीर.

25) पहिल्या खेलो इंडिया विद्यापीठ स्तरीय स्पर्धा भुवनेश्वर, ओदिशा येथे पार पडल्या.

26) 2020 च्या जागतिक उत्पादकता परिषदेचे आयोजन भारतात केले जाणार आहे.

27) भारतात कोरोनाच्या रुग्णांची संख्या वाढली. जवळपास 87 देशात कोरोनाचा फैलाव.